# जिल्हा परिषद रत्नागिरी

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन

## पहिला मजला, माळनाका, रत्नागिरी ४१५ ६१२

## बांधकाम विभाग चिपळण

| | |
|---|---|
| दुरध्वनी क्रमांक - (०२३५२) २२२३६८ | e-mail : eezpchiplun@gmail.com |


| | | |
|---|---|---|
| जा.क्र.रजिप/बांधकाम चिपळूण/ए-१/टेंडर/१७०८/२०२२ | दिनांक :- | १२.०५.२०२३ |

प्रति,

**श्री.सुहेल मुंजिर दाभिळकर,**
**मु.पो.मंडणगड, ता.मंडणगड,**
**जि.रत्नागिरी**

विषय :- **कामाचे कार्यारंभ आदेश.....**

**घुमरी गणेशमंदीर ते गावांतर्गत रस्त्याला पेवर ब्लॉक बसविणे ता.मंडणगड, जि.रत्नागिरी**

**लेखाशिर्ष :- आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२२-२३**

**अंदाजपत्रकीय रक्कम ५,००,०००/-**

**निविदा रक्कम :- ४,३६,७३९/-**

**निविदा मंजुर रक्कम - ४,३६,७३९/-**

वर उल्लेखिलेल्या कामासाठी आपण रक्कम रुपये **५००/-** च्या मुद्रांकावर सदर कामाचा करारनामा पूर्ण केलेला आहे. तरी उपरोक्त कामांचे निविदे रक्कमेनुसार काम सुरू करण्यास या द्वारे आदेश देण्यात येत आहेत. तरी उपअभियंता **दापोली युनिट मंडणगड** यांचेकडून कामाची माहिती करुन घेऊन त्याप्रमाणे कामाला सुरवात करावी. कामाची मुदत पावसाळा वगळून मुदत दि.११ जानेवारी २०२४ पर्यंत असुन ती या आदेशाचे तारखेपासून मोजण्यात येईल.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन परिपत्रक क्र.जिपर २०००/प्र.क्र.८३७/३५, मंत्रालय, मुंबई दि.०८ मे २००२ चे परिपत्रकानुसार मक्तेदाराने सोपविलेले कामाचा व ते पूर्ण करण्यासाठी नियुक्त केलेल्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. सदर विमा प्रत्यक्ष काम सुरु करणेपुर्वी उतरविणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास दंडात्मक कारवाई करणेत येईल याची नोंद घ्यावी. तसेच गौणखनिज फी शासनास वेळच्या वेळी जमा करणे आवश्यक आहे तसेच काम सुरु करण्यापूर्वी कामाचे ठिकाणी माहितीफलक लावण्यात यावा. कामाचे देयक अनुदान उपलब्धते नुसार देण्यांत येईल. देयकातून शासकीय नियमानुसार वस्तू व सेवा कराची कपात करणेत येईल. तसेंच गौणखनिज व वस्तू व सेवा कर, इतर कर शासन नियमानुसार मक्तेदाराला आदा करणेत येईल. कामातील उणीवांच्या दुरुस्ती कालावधी (Defect Liability Period हा महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२, मुंबई ४०० ०३२ दि.१४ जानेवारी २०१९ अन्वये पाच वर्षे निर्धारीत करणेत येईल.

**सदर कार्यारंभ आदेश हा जिल्हा परिषदेच्या http://www.zpratnagiri.org या सांकेतस्थळावर उपलब्ध करणेत आलेला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२३०५१४९१२५० हा आहे.**

कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग चिपळण
जिल्हा परिषद रत्नागिरी

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती, **मंडणगड, ता.मंडणगड** यांचेकडे

प्रत :- उप अभियंता, जिल्हा परिषद उपविभाग **दापोली युनिट मंडणगड, ता.दापोली** यांचेकडे

**१/- सदर कामाची जागा जिल्हा परिषदेच्या मालकीची असलेबाबत खात्री करणेत यावी. मक्तेदार यांनी उपरोक्त परिपत्रकाप्रमाणे विमा उतरविल्याची खात्री केले नंतरच (विमा भरणा पावती दिलेनंतरच) कामाची माहिती व आखणी करुन दयावी. कामाचे प्रगतीकडे लक्ष द्यावे वरील सुचनाचे तंतोतंत अनुपालनाकडे लक्ष द्यावे. प्रशासकीय मान्यतेमधील अटी व शर्तीचे पालन करावे. मंजूर अनुदापेक्षा जास्त खर्च करु नये त्यापेक्षा जास्त खर्च केल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील.**

२/- संबधीत एस.क्यु.म. यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी उप अभियंता **दापोली युनिट मंडणगड, ता.दापोली** यांचे मार्फत

प्रत :- **पीबी- ०३** यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

२/- सदर कामांकरीता आवश्यक असलेला निधी उपलब्ध करणेबाबत [illegible]